# रिटेल किंग किशोर बियाणींच्या उपस्थितीत अमनोरा टाऊन सेंटरच्या पहिल्या फेजचे उदघाटन

पुणे, दि. २५ ऑगस्ट, हडपसर येथे साकारत असलेल्या अमनोरा टाऊन सेंटरच्या पहिल्या फेजचे उदघाटन काल (दि. १८ ऑगस्ट) रोजी रिटेल किंग किशोर बियाणी यांच्या उपस्थितीत पार पडले. या उदघाटन प्रसंगी सिटी कॉर्पोरेशन लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक अनिरुध्द देशपांडे, एव्हरस्टोन इन्व्हेस्टमेंट अडव्हायसर्सचे व्यवस्थापकीय भागीदार शिशिर बैजल, अमनोरा टाऊन सेंटरचे केंद्र संचालक किम कली, सिटी कॉर्पोरेशन लिमिटेडचे चीफ ऑपरेटींग ऑफिसर जे. के. भोसले, नगरसेवक चेतन तुपे आदी मान्यवर उपस्थित होते.

सिटी रिअल्टी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन तर्फे उभारण्यात येत असलेले अमनोरा टाऊन सेंटर हे ११ लाख चौ. फू. भव्य शॉपिंग आणि मनोरंजनाचे डेस्टिनेशन म्हणून विकसित होत आहे. पुण्यातील या सर्वात मोठ्या शॉपिंग आणि लाईफस्टाईल सेंटरमध्ये कपडे, घरात लागणा-या अनेकविध वस्तू, पोटपूजेचे पर्याय, करमणूकीचे पर्याय, गेमिंग या सर्व प्रकारांचा समावेश आहे. उच्चभ्रू ग्राहकांप्रमाणेच सर्वसामान्य ग्राहकांनाही आकर्षित करतील अशी रिटेल आऊटलेट, चित्रपटगृहे, क्विक सर्व्हिस रेस्टॉरन्ट, कॅफे आणि फाईन डायनिंग असे अमनोरा टाऊन सेंटरमधील विविध पर्याय कुटुंबाला सुटीचा पूर्ण दिवस गुंतवून ठेवू शकतील.

अधिक माहितीसाठी संपर्क – तुषार ९८२२० ५७६२५ / अमित ९८८१२ ३५५८९